**(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद.)**

**सुप्रिम कोर्ट रिपोर्ट्स [१९६० (२) पान नं. ३४६]**

**जम्मू आणि काश्मीर राज्य आणि इतर**

**विरुद्ध**

**ठाकूर गंगा सिंग आणि इतर**

***(मुख्य न्या. बी. पी. सिन्हा, न्या.पी. बी. गजेंद्रगडकर, न्या. के. सुब्बा राव, न्या. के. सी. दास गुप्ता आणि न्या. जे. सी. शाह)***

*सर्वोच्च न्यायालय, अपिल अधिकारिता - अपील करण्याची विशेष परवानगी- केव्हा दिली जाऊ शकते- घटनेच्या अर्थउकलाबाबत कायद्याबाबतचा सारभूत प्रश्न- चा अर्थ - भारतीय घटनेचे अनुच्छेद १३२(२).*

जम्मू-काश्मीर मोटार वाहन नियमाच्या नियम ४-४७ च्या निर्बंधाना आव्हान देणारी याचिका उत्तरवादींनी जम्मू-काश्मीर उच्च न्यायालयात दाखल केली आहे. उच्च न्यायालयाने हा नियम घटनेच्या अनुच्छेद १४

चा भंग' करणारा असल्याने अधिकारबाहेरचे असल्याचे म्हटले आहे. हा नियम घटनेच्या अनुच्छेद १४ चा भंग' करणारा असल्याचे म्हटले आहे. अपीलकर्त्यांनी घटनेच्या अनुच्छेद १३२(१) अन्वये प्रमाणपत्र मिळावे यासाठी उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला होता, जो या प्रकरणात घटनेच्या अर्थाबाबतचा कोणताही सारभूत प्रश्न नसल्याच्या कारणास्तव फेटाळण्यात आला. त्यानंतर अपीलकर्त्याने घटनेच्या अनुच्छेद १३२(२) अन्वये विशेष परवानगी मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला, जो उतरवादीला अपीलाच्या दाखल योग्यतेचा प्रश्न उपस्थित करण्याचे स्वातंत्र्य देऊन देण्यात आला. घटनेच्या अनुच्छेद १४ च्या अर्थासंदर्भात पक्षकारांमध्ये कोणताही वाद नव्हता आणि हा वाद रास्त वर्गीकरणाच्या कसोटीवर खरा उतरतो का, या प्रश्नाभोवती केंद्रित होता. घटनेच्या अनुच्छेद १३२(२) अन्वये विशेष परवानगी हे न्यायालय तेव्हाच देऊ शकते, जेव्हा त्या प्रकरणात घटनेच्या अर्थासंबंधी कायद्याचा सारभूत प्रश्न आहे, असे समाधान झाले तरच हे न्यायालय विशेष परवानगी देऊ शकते, असा प्राथमिक आक्षेप उत्तरवादिनी घेतला आणि सध्याच्या प्रकरणात, घटनेच्या अनुच्छेद १४ संदर्भातील अर्थाबाबत या न्यायालयाच्या अनेक निर्णयांमुळे, तो वादग्रस्त नव्हता आणि कायद्याचा कोणताही प्रश्न, कायद्याच्या सारभूत प्रश्नापेक्षा कमी विचारार्थ निर्माण होऊ शकत नाही, म्हणून या अनुच्छेदानुसार विशेष परवानगी देता येणार नाही.

अपीलकर्त्यांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, जेव्हा जेव्हा वर्गीकरणाचा प्रश्न उपस्थित केला जातो तेव्हा, आक्षेपित वर्गीकरणाचा संबंध आहे तितका, त्यामध्ये घटनेच्या अनुच्छेद १४ चा अर्थ समाविष्ट असतो.

असा निर्णय देण्यात आला की : घटनेच्या अनुच्छेद १३२(२) अंतर्गत तत्त्व असे आहे की, घटनेचा अर्थलावण्याचा अंतिम अधिकार हा सर्वोच्च न्यायालयाकडेच असावा, त्या उद्देशानेच अनुच्छेद १३३ आणि १३४ अन्वये लादलेल्या इतर मर्यादांपासून हे अनुच्छेद मुक्त आहे आणि घटनेच्या अर्थासंबंधी केवळ कायद्याचा सारभूत प्रश्न असलेल्या प्रकरणाच्या कार्यवाहीचे स्वरूप काहीही असले तरी हा व्यापक स्वरूपाच्या अपीलाचा अधिकार दिला जातो .

एखाद्या तरतुदीचा अर्थउकल म्हणजे शब्दाचा खरा आशय किंवा अर्थ समजून घेण्याची पद्धत. जेव्हा पक्षकार एखाद्या तरतुदीच्या खऱ्या अर्थाबद्दल सहमत आहेत किंवा त्यासंदर्भात कोणताही प्रश्न उपस्थित करीत नाहीत, तेव्हा त्या प्रकरणात घटनेच्या अर्थाबद्दल कायदेविषयक कोणताही प्रश्न समाविष्ट नसतो. **जे**थे ह्या न्यायालयाने अंतिम आणि अधिकृतपणे निर्णय दिला आहे त्याबाबत कायद्याचा कोणताही सारभूत प्रश्न निर्माण होऊ शकत नाही.

चालू प्रकरणात उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नामध्ये घटनेच्या अर्थाबाबत कोणताही प्रश्न समाविष्ट नाही.

टी. एम. कृष्णास्व पिल्लई विरुद्ध गव्हर्नर जनरल इन कौन्सील (१९४७) ५२ सी.डब्ल्यू.एन. (एफ.आर.)१, भूदान चौधरी वि. बिहार राज्य (१९५५)१ एससीआर १०४५, चिरंजीत लाल चौधरी वि. भारत संघराज्य (१९५०) एस.सी.आर. ८६९, राम कृष्ण दालमिया विरुद्ध न्यायमूर्ती तेंडोलकर (१९५९) एस.सी.आर. २७९ आणि मोहम्मद हनीफ कुरेशी वि. बिहार राज्य, (१९५९) एस.सी.आर. ६२९, यांवर भिस्त होती.

**दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्रमांक १९५९ चा २१७**

१९५८ च्या रिट याचिका क्रमांक १०८ मध्ये जम्मू-काश्मीर उच्च न्यायालयाच्या दि. २० जून १९५८ रोजीच्या न्यायनिर्णय व आदेशाविरुद्ध विशेष परवानगीने अपील.

अपीलकर्त्यांच्या वतीने भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एच. एन. सन्याल, एन. एस. बिंद्रा, आर. एच. ढेबर आणि टी. एम. सेन.

उत्तरवादीन करिता, आर. के. गर्ग आणि एम. के. राममूर्ती, एस. एन. अंडले, जे. बी. दादाचांजी, रामेश्वर नाथ आणि पी. एल. व्होरा.

२६ नोव्हेंबर १९५९ रोजी **न्यायमुर्ती सुब्बा राव** यांनी न्यायालयाचा निर्णय पारित केला.

विशेष परावानगीने केलेले हे अपील घटनेच्या अनुच्छेद १३२(२) च्या व्याप्तीचा प्रश्न उपस्थित करते-

पहिला उत्तरवादी मेसर्स जम्मू काश्मीर मेकॅनिक्स अँड ट्रान्सपोर्ट वर्कर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड जम्मू (यापुढे सोसायटी म्हणून संबोधण्यात आले आहे) या दुसऱ्या उत्तरवादीच्या भागधारकांपैकी एक आहे. या सोसायटीची नोंदणी जम्मू-काश्मीर सहकारी संस्था अधिनियम नंबर १९९३ चा ६ (विक्रिमी) अंतर्गत करण्यात आली होती. जम्मू-काश्मीर राज्यातील विविध मार्गांसाठी स्टेज कॅरेज आणि पब्लिक कॅरिअर परमिट मिळावे यासाठी त्यांनी तिसऱ्या अपीलकर्त्यासमोर अनेक अर्ज केले, परंतु जम्मू आणि काश्मीर मोटार वाहन नियम (यापुढे नियम म्हणून संबोधण्यात आले आहे) च्या नियम ४-४७ अन्वये सेवा परवाना केवळ भागीदारी कायद्यांतर्गत नोंदणीकृत कंपनीला किंवा व्यक्तीला दिला जाऊ शकतो आणि सोसायटी व्यक्ती किंवा भागीदारी नसल्यामुळे ती नियमांनुसार परवान्यासाठी पात्र नाही या कारणास्त्व त्यांना कोणतेही परवाने देण्यात आले नाहीत. उतरवादींनी जम्मू-काश्मीर च्या घटनेच्या कलम १०३ अन्वये जम्मू-काश्मीर उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून या नियमावलीच्या नियम ४-४७ च्या निर्बंधाना आव्हान दिले आहे. त्या याचिकेत अपीलकर्ते म्हणजे जम्मू-काश्मीर राज्य सरकार, परिवहन मंत्री, नोंदणी प्राधिकरण आणि वाहतूक अधीक्षक यांना उतरवादी करण्यात आले होते. उच्च न्यायालयाने हा नियम घटनेच्या अनुच्छेद १४ चा भंग' करणारा असल्याने

अधिकारबाहेरचे असल्याचे म्हटले आहे आणि त्या निष्कर्षावर उच्च न्यायालयाने आणि त्यावर या नियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यापासून अपीलकर्त्यांविरुद्ध परमादेश जारी करण्याचे आदेश दिले. याचिकाकर्त्यांनी घटनेच्या अनुच्छेद १३२ (१) अन्वये प्रमाणपत्रासाठी उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला, परंतु या प्रकरणात घटनेच्या अर्थासंबंधी कायद्याचा कोणताही सारभूत प्रश्न नसल्याचे कारण देत उच्च न्यायालयाने तो फेटाळून लावला. त्यामुळे अपीलकर्त्यांनी घटनेच्या अनुच्छेद १३२ (२) अन्वये विशेष परवानगीसाठी अर्ज केला आणि या न्यायालयाने तो मंजूर केला. विशेष परवानगी देण्याच्या आदेशात उतरवादींना अंतिम सुनावणीत अपीलाच्या_*दाखल योग्यतेचा* प्रश्न उपस्थित करण्याचे स्पष्ट स्वातंत्र्य देण्यात आले आहे .

उतरवादींच्या विद्वान वकिलांनी अपिलाच्या_दाखल योग्यतेवर_प्राथमिक आक्षेप नोंदविला. थोडक्यात त्यांचा आक्षेप असा आहे की, घटनेच्या अनुच्छेद १३२ (२) अन्वये विशेष परवानगी तेव्हाच दिली जाऊ शकते जेव्हा सर्वोच्च न्यायालयाचे असे समाधान होईल की या प्रकरणात घटनेच्या अर्थउकलासाठी कायद्याचा सारभूत प्रश्न आहे आणि असा की सध्याच्या प्रकरणात राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ च्या अन्वयार्थाबाबत या न्यायालयाकच्या अनेक निर्णयाँनी कायदा अविवादीतपणे पूर्णपणे प्रस्थापित झाला आहे आणि त्यामुळे घटनेच्या अन्वयार्थाबाबत कायद्याचा सारभूत प्रश्नच विचारार्थ उद्भवत नाही आणि म्हणून सदर अनुच्छेद अंतर्गत विशेष परवानगी दिली जाऊ शकत नाही.

विद्वान अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांनी खालील पद्धतीने हा युक्तिवाद पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे :-

जेव्हा जेव्हा अशा वर्गीकरणाचा प्रश्न उपस्थित केला जाते, तेव्हा तेव्हा आक्षेपित वर्गीकरणाच्या संदर्भात घटनेच्या अनुच्छेद १४ चे विवेचन समाविष्ट असते- हे वेगळ्या प्रकारे सांगायचे तर, त्यांचा युक्तिवाद असा आहे की, प्रत्येक प्रकरणात प्रश्न असा आहे की, वर्गीएकरणामुळे अनुच्छेद १४ च्या समानतेच्या तत्वाचे उलंघन होतो की नाही. त्यामुळे एक नोंदणीकृत संस्था, मर्यादित कंपनी आणि एक व्यक्ती यांचे गुणधर्म समान आहेत का, हा घटनेच्या अनुच्छेद १४ च्या अर्थउकलाचा प्रश्न आहे.

त्यामुळे परस्परविरोधी कथनांची वैधता तपासण्यापुर्वी उच्च न्यायालयात नेमका काय प्रश्न उपस्थित करण्यात आला आणि त्यावर काय निर्णय देण्यात आला, हे थोडक्यात जाणून घेणे सोयीचे ठरेल. सोसायटीच्या वतीने उच्च न्यायालयात युक्तिवाद करण्यात आला की, ४-४७ अन्वये केवळ भागीदारी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत व्यक्ती किंवा संस्थेलाच परवाना दिला जाऊ शकतो; सहकारी संस्था अधिनियम किंवा इतर कोणत्याही अंतर्गत नोंदणीकृत महामंडळाला नव्हे, आणि म्हणूनच हा नियम भेदभावपूर्ण स्वरूपाचा असल्याने घटनेच्या अनुच्छेद १४ के उलंघन करतो. अपीलकर्त्यांच्या वतीने बाजू मांडणाऱ्या विद्वान महाधिवक्ता यांनी असा युक्तिवाद केला की , घटनेच्या अनुच्छेद १४

अन्वये तर्कसंगत वर्गीकरणास परवानगी आहे आणि विधानमंडळाने अशा आधारावर हा नियम तयार केला आहे, ज्याचा उद्देश जनतेच्या हिताचे रक्षण करणे हा आहे. उच्च न्यायालयाने परस्परविरोधी युक्तिवादांचा विचार करून वर्गीकरणाच्या कोणत्याही तर्कसंगत आधारावर हा नियम पुढे सरकत नाही व मनमानी पध्धतीने महामंडळाला एकाकी पाडण्यची भेदभावयुक्त वागणुक देणारा हा नियम घटनेक्या समानतेच्या तरतुदीचे उलंघन करनारा आहे असे मत व्यक्त केले. अपीलकर्त्यांनी या न्यायालयात दाखल केलेल्या विशेष परवानगीच्या याचिकेत उच्च न्यायालयाच्या निष्कर्षाच्या अचूकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी ठामपणे सांगितले की हा नियम वाजवी वर्गीकरणावर आधारित आहे आणि म्हणूनच घटनेच्या अनुच्छेद १४ च्या विरोधी म्हणून रद्द केला जाऊ शकत नाही. इतर कारणांमद्धे दोन वर्गांमद्धे समजण्याजोगे फरक असणाऱ्या दोन वर्गांचे वेगवेगळी गुणधर्म समोर आणण्याच्या प्रयत्न करुन त्यांनी हाच मुद्दा संविस्तरपणे मांडला. त्यांनी त्यांच्या अपीलात उपस्थित करण्यासाठी प्रस्तावित असणारा प्रश्न स्पष्टपणे खालीलप्रमाणे मांडला आहे :

**कारण क्र.४**; ‘‘वरील नियम ४-४७ (मोटार वाहन नियमाचा) हा वाजवी वर्गीकरणावर आधारित आहे आणि म्हणून पुर्णपणे अधिकारांतर्गत व वैध होता आणि आहे आणि घटनेच्या अनुच्छेद १४ प्रतिकूल काराणस्त्व रद्द करणे शक्य नव्हते.”

**कारण क्र ६**; “ निगम निकाय आणि भागिदारी कायद्याच्या तरतूदी अंतर्गत नोंद झालेली भागीदारी या दोघांमध्ये लक्षनीय फरक आहे. हा फरक वर्गीकरणाचा बौध्दीयुक्त फरक दाखवतो. माननीय उच्च न्यायालयाने केवळ एका मुद्द्याचा उल्लेख केला आहे आणि फरकाच्या इतर मुद्द्यांकडे दुर्लक्ष करुन वरील नियम ४-४७ रद्द करण्याची चूक केली आहे.”

कारण **क्र.८**; “नियम ४-४७ हा प्रचलित स्थानिक परिस्थितीनुरुप तयार करण्यात आला आहे. तेव्हा वाहतुकीच्या बाबतीत सहकारी संस्था व महामंडळे यांना परवाना किंवा परमिट देण्यासाठी ते योग्य मानले जात नव्हते. केलेले वर्गीकरण तर्कसंगत आणि वाजवी आहे. कृत्रिम व्यक्तींना या नियमाच्या कक्षेतून वगळणे स्वाभाविक आहे मात्र भेदभावपूर्ण नाही.

इतर कारणे केवळ वरील मुद्द्यांचे अधिक स्पष्टीकरण आहेत. अपीलकर्त्यांनी त्यांच्या प्रकरणाच्या निवेदनाच्या भाग २ मध्ये खालीलप्रमाणे म्हटले आहे;

“अनुच्छेद १४ मध्ये वर्ग विधीविधानाला मनाई असली, तरी कायद्याच्या हेतूने वाजवी वर्गीकरण करण्यास मनाई नाही, हे आता पूर्णपणे प्रस्थापित झाले आहे.”

उतरवादींनी त्यांच्या खटल्याच्या निवेदनात वरील कायदेशीर भूमिका मान्य केली, परंतु वाजवी वर्गीकरण आहे या भूमिकेला विरोध केला. त्यामुळे घटनेच्या अनुच्छेद १४ च्या विवेचनासंदर्भात पक्षकारांमध्ये कधीही वाद झाला नाही, तर त्यांचा वाद केवळ हा नियम

वाजवी वर्गीकरणाच्या कसोटीवर खरा उतरतो का, या प्रश्नावरच केंद्रित होता, हे उघड आहे.

ह्या पार्श्वभुमीवर घटनेच्या अनुच्छेद १३२(२) अन्वये अपीलकर्त्यांना विशेष परवानगी देता येईल का?

अनुच्छेद १३२(२) मध्ये म्हटले आहे:

"जेव्हा उच्च न्यायालयाने असे प्रमाणपत्र देण्यास नकार दिला असेल, तर घटनेच्या त्या प्रकरणात अर्थउकलाबाबत सारभूत प्रश्न अंतर्भूत झाला असल्याबबत समाधान झाल्यास सर्वोच्च न्यायालय त्या न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा अंतिम आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यासाठी विशेष परवानगी मंजुर करू शकते."

प्रकरणात घटनेच्या अर्थाबाबत कायद्याचा प्रश्न असावा आणि (२) हा प्रश्न हा कायद्याचा सारभूत प्रश्न असावा या दोन अटींची पूर्तता झाल्याशिवाय अनुच्छेद १३२(२) अन्वये विशेष परवानगी देण्यास वाव नाही. घटनेचा अर्थ लावण्याचा अंतिम अधिकार सर्वोच्च न्यायालयाकडे असावा, हे या अनुच्छेदामागचे तत्त्व आहे; त्या उद्देशाने अनुच्छेद १३३ आणि १३४ अन्वये लादण्यात आलेल्या इतर मर्यादांपासून हे अनुच्छेद मुक्त आहे आणि घटनेच्या अर्थउकलाबाबत कायद्याच्या केवळ सारभूत प्रश्नांचा समावेश असलेल्या

कोणत्याही प्रकरणात कार्यवाहीचे स्वरूप लक्षात घेता, व्यापक असा अपीलाचा अधिकार मान्य आहे.

तरतुदीचा अर्थउकल म्हणजे काय? अर्थउकल ही अशी पद्धत आहे ज्याद्वारे शब्दाचा खरा अर्थ किंवा आशय समजतो. एखाद्या तरतुदीचे दोन किंवा त्यापेक्षा अधिक संभाव्य अर्थबोध घेण्याचा प्रयत्न केला तरच अर्थउकलाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. एक पक्ष एक अर्थ सुचवतो आणि दुसरा वेगळा अर्थ. परंतु जेथे पक्षकार एखाद्या तरतुदीच्या खऱ्या अर्थावर सहमत असतात किंवा त्यासंदर्भात कोणताही प्रश्न उपस्थित करत नाहीत, तेथे घटनेच्या अर्थाविषयी कायद्याचा काही प्रश्न आहे असे मानणे शक्य नाही. अनुच्छेद १४ च्या अर्थउकलानुसार या न्यायालयाच्या अनेक निर्णयांनी वर्गीकरणाचा सिद्धांत विकसित केला आहे. आम्ही दाखवून दिल्याप्रमाणे, या कामकाजाच्या कोणत्याही टप्प्यावर अनुच्छेद १४ च्या अर्थउकलाच्या अचूकतेवर किंवा वर्गीकरणाचा सिद्धांत शासित करणाऱ्या कोणत्याही तत्वांवर कोणत्याही पक्षाने प्रश्न चिन्ह उपस्थित केले नाही. वास्तविकतः ह्या सिद्धांताचा स्वीकार करत अपीलकर्त्यांनी नियमांतर्गत वैध वर्गीकरण असल्याचा युक्तिवाद केला, तर प्रतिवादींनी विरोधाभासी युक्तिवाद केला. विद्वान अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांनी प्रथमच आमच्यासमोर असा युक्तिवाद केला की, या आपिलाने समानतेच्या सिद्धांताचा एक नवीन पैलू असल्याचा युक्तिवाद केला. तो म्हणजे समानतेच्या कलमानुसार कृत्रिम व्यक्ती आणि नैसर्गिक व्यक्तीमध्ये समान गुणधर्म आहेत

का – आणि त्यामुळे ह्या प्रक्ररणात घटनेच्या अर्थउकलाचा प्रश्न समाविष्ट आहे. आमच्या मते हा युक्तिवाद म्हणजे तीच बाब दुसऱ्या पध्दतीने मांडणे आहे. जर विश्लेषण केल्यास तो युक्तिवाद असा आहे की कृत्रिम व्यक्ती आणि नैसर्गिक व्यक्ती यांचे गुणधर्म वेगवेगळे असल्याने त्यांच्यात केला जाणारा फरक वैध आहे. हा युक्तीवाद घटनेच्या अनुच्छेद १४ चा नविन अर्थ सांगत नसून त्या नियमाला वर्गीकरणाच्या सिद्धांतात आणण्याचा एक प्रयत्न आहे, त्यामुळे या प्रकरणात उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नात घटनेच्या अर्थउकलासंबंधी कायद्याचा प्रश्नच येत नाही, असे आमचे मत आहे.

या प्रकरणामध्ये घटनेचा अर्थ लावण्यात कायद्याचा प्रश्न निर्माण होतो, असे गृहीत धरले तर उपस्थित केलेला प्रश्न हा अनुच्छेद १४ च्या पोटवाक्य (२) च्या अर्थांतर्गत कायद्याचा सारभूत प्रश्न आहे, असे म्हणता येईल का? टी.एम. कृष्णस्वामी पिल्ले विरुद्ध गव्हर्नर जनरल इन कौन्सिल[1] या प्रक्रणात फेडरल कोर्टाने या पैलूचा विचार केला आहे. हा निर्णय भारत सरकार अधिनियम, १९३५ च्या कलम २०५ मधील तरतुदींवर आधारित होता. त्या कलमाचा महत्वाचा भाग म्हणतो –

कलम २०५: " (१) जर उच्च न्यायालयाने प्रमाणित केले की त्या प्रकरणात कायद्याच्या अर्थाबाबत किंवा त्याअंतर्गत केलेल्या कौन्सिलच्या कोणत्याही आदेशाबद्दल कायद्याचा

1 (१९४७), ५२ सी. डबलू. एन. (एफ. आर.) १

सारभूत प्रश्न आहे तर त्या उच्च न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा अंतिम आदेशापासून फेडरल कोर्टाकडे अपील करता येइल.....”

मद्रास उच्च न्यायालयाने त्या प्रकरणात भारत सरकार अधिनियम, १९३५ च्या कलम २४० (३) च्या अर्थासंबंधी कायद्याचा सारभूत प्रश्न असल्याचे प्रमाणपत्र दिले. या कायद्याच्या कलम २४० (३) अन्वये भारतातील राजघराण्याच्या नागरी सेवेचा सदस्य असलेल्या किंवा भारतातील राजघराणेअंतर्गत कोणतेही नागरी पद भूषविलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्याच्यासंदर्भात प्रस्तावित कारवाई विरोधात कारणे दाखविण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय बडतर्फ केले जाऊ शकत नाही किंवा पदोन्नती कमी करता येत नाही. उच्च न्यायलयाने, समोर आलेल्या तथ्थ्यांवरुन, मत मांडले की, त्या कलमाच्या अर्थानुसार अपीलकर्त्याला कारण देण्यात पुरेशी संधी देण्यात आलेली आहे, परंतु भारत सरकार अधिनियम, १९३५ च्या कलम २०५ (१) अन्वये प्रमाणपत्रही दिले. त्या प्रकरणाच्या परिस्थितीत प्रमाणपत्र देण्याच्या औचित्याचा विचार करताना न्या. जफरुल्ला खान यांनी पान नं.२ वर थोडक्यात आणि स्पष्टपणे म्हटले आहे की:

‘आमच्यासमोर असा युक्तिवाद करण्यात आला की, कायद्याच्या कलम २४० उपकलम (३) च्या अर्थउकलाचा प्रश्न या प्रकरणात समाविष्ट आहे. या उप कलमाच्या अर्थउकलाबाबत सचिव, भारत सरकार वि. आय.एम. लाल [(१९४५) फेडरल कोर्ट

रिपोर्टस १०३] या प्रकरणात या न्यायालयाला त्या उप कलमाच्या अर्थउकलाबाबत जेवढया मार्गदर्शनाची आवश्यकता होती तितके मर्गदर्शन करण्यात आले आहे. उर्वरित हा तथ्थ्यांवर आधारित्त सोपा प्रश्न होता. आमच्या न्यायनिर्णयात “या प्रकरणात घटनेच्या अर्थउकलाबाबत "कायद्याचा कोणताही सारभूत प्रश्न" समाविष्ट नव्हता, जो कायद्याच्या कलम २०५ (१) अंतर्गत प्रमाणपत्राचा आधार बनू शकला असता.”

घटनेच्या अनुच्छेद १४ च्या अर्थउकलाबाबतच्या प्रश्नावर या न्यायालयाने बुधन चौधरी वि. बिहार राज्य[२] या प्रकरणात त्या कलमाचा खरा अर्थ आणि व्याप्ती खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे :

“अनुच्छेद १४ वर्गलक्षी विधीवधानाला मनाई करत असले तरी कायद्याच्या उद्देशपुर्तीसाठी तर्कसंगत वर्गीकरणाला ते मनाई करत नाही, हे आता सर्वश्रुत झाले आहे. तथापि, अनुज्ञेय वर्गीकरणाची कसोटी पास करण्यासाठी दोन अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे, ते म्हणजे, (१) वर्गीकरण, एका सुबोध भिन्नतेवर आधारित असावे जे समूहातून वगळलेल्या एकत्र असलेल्या व्यक्ती किंवा वस्तूंना इतरांपेक्षा वेगळे करते आणि (२) विषयाधीन कायद्याच्या उद्देशपुर्तीशी ते वर्गीकरण तर्कसंगत असायला हवे. वर्गीकरण वेगवेगळ्या आधारांवर स्थापित केले जाऊ शकते- म्हणजे, भौगोलिक किंवा वस्तू किंवा

२. (१९५५) १ एस. सी. आर. १०४५, १०४९

व्यवसायानुसार किंवा तत्सम. म्हत्वाचे काय आहे की वर्गीकरणाचा आधार आणि विचाराधीन कायद्याचा उद्देश यांच्यात परस्परसंबंध असायला हवा. या न्यायलयाने चिरंजीत लाल चौधरी विरुद्ध भारत सरकार[३] या आणि त्यानंतरच्या निर्णयांत मांडलेल्या मताची ही पुनरवृत्तीच आहे. ह्या न्यायालयाच्या राम कृष्ण दालमिया विरुद्ध न्यायमूर्ती तेंडोलकर[४] आणि महंमद हनिफ कुरेशी विरुद्ध बिहार राज्य [५]या प्रकरणात नुकत्याच झालेल्या निर्णयांमध्ये ही तत्वे ठामपणे सांगण्यात आली आहेत. ह्या निर्णयांच्या अनुषंगाने वर्गीकरणाच्या सिद्धांताच्या तुलनेत घटनेच्या अनुच्छेद १४ मधील तरतुदींवर नवा अर्थ लावण्यास आता वाव नाही. वर्गीकरणाच्या संदर्भात अनुच्छेद १४ चा अर्थ या भूमीच्या सर्वोच्च न्यायालयाने निकाली काढला आहे आणि राज्यघटनेच्या अनुच्छेद १४१ अन्वये हा अर्थउकल भारताच्या हद्दीतील सर्व न्यायालयांवर बंधनकारक आहे. उच्च न्यायालयाने केवळ त्यांच्या समोर आलेल्या तथ्यांना हा अर्थउकल लागू करणे बाकी होते. त्यामुळे ज्या कायद्याचा अंतिमरित्या आणि प्राधिकृतपणे निर्णय या न्यायालयाने जिथे घेतला आहे, तिथे कायद्याचा सारभूत प्रश्न निर्माण होऊ शकत नाही.

३. [१९५०] एस. सी. आर. ८६९

४. [१९५९] एस. सी. आर. २७९

५. (१९५९] एस. सी. आर. ६२९

परिणामी आम्ही प्राथमिक आक्षेप स्वीकारतो आणि खर्चासह अपील फेटाळून लावतो.

अपील फेटाळले.

--xx—xx—xx—xx—xx--

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

--xx—xx—xx—xx—xx--